लोकमत

न्यूज Inbox

# पाथर्डी येथे सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा

**मुंडगाव :** पाथर्डी येथील निळकंठ सपकाळ कनिष्ठ महाविद्यालयात नुकताच सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा कार्यक्रम संपन्न झाला. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनात सुमित सपकाळ व अनिकेत भुडके यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नंदकिशोर मेतकर होते. कार्यक्रम क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल यांच्या सहयोगाने झाला.

Hello Akola Gramin
Page No. 3 Oct 21, 2023
Powered by: erelego.com